NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 34) 1st May 2009 ( No : 06

# "मंत्रालयाचा निर्णय" झालेला आहे, पण "नोकरशाहीचा निर्णय" अजून व्हावयाचा आहे !

## *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव*

१. मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय किंवा मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर मंत्र्यांनी दिलेली आश्वासने किंवा अभिवचने यांच्याबद्दल मनामध्ये कमालीची तुच्छतेची भावना बाळगणा-या नोकरशाहीच्या अहंकारी वृत्तीचे जे दर्शन महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संदर्भात स्पष्टपणे समोर येत आहे ते अत्यंत अचंबीत करणारे आहे. (अ) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून सेवेत भरती होतांना धारण करावयाच्या नेटसेटच्या पात्रता अटीविषयी (ब) सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करण्याविषयी (क) या स्तरावरील शिक्षकांच्या विविध समस्या व प्रश्नांविषयी जे एकूणच धोरण नोकरशाहीने स्वीकारले आहे त्यावरील बुरखा ओढून त्याचे खरे स्वरुप लोकांसमोर मांडण्याचा हे कार्यकारी मंडळ निर्धार व्यक्त करीत आहे. मंत्रालयाचा निर्णय झालेला आहे पण नोकरशाहीचा निर्णय व्हावयाचा आहे या स्थितीला सामोरे जाण्याची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघासमोर आणखी पुन्हा एकदा वेळ आलेली आहे असेही या कार्यकारी मंडळाचे मत आहे.

### नेटसेट बाबत

२.१ **नेटसेट बाबत राज्याच्या मंत्रिमंडळाचा निर्णय व निर्गमित झालेला शासननिर्णय** : महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी ११ जानेवारी ते १८ जानेवारी १९८९ या कालखंडात झालेल्या चर्चेच्या शेवटी जे मतैक्य पत्र नोंदविण्यात आले त्याच्या पहिल्याच परिच्छेदात असे नमूद आहे की :- "The Government of India's suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges dated 17th June, 1987 as amended by subsequent agreement dated 4th and 5th Sept., 1987 and Govt. of India's suggestions dated 22nd July, 1988, would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotion involved therein as a composite scheme w.e.f. 1.1.1986." केंद्र शासनाची व्यवस्था **एक समग्र योजना** म्हणून अमलात आणण्याचे मान्य करण्यात आले. त्याप्रमाणे मंत्रिमंडळाचा निर्णय झाला, व त्याप्रमाणे प्रत्यक्ष शासन निर्णय २७ फेब्रुवारी १९८९ रोजी निर्गमित झाला.

२.२ **मा. मुख्यमंत्र्यांचे सभागृहातील आश्वासन** : राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या मतैक्यपत्राच्या विरोधात, शासननिर्णयाच्या विरोधात, एका अंडर सेक्रेटरीने पत्ररुपी आदेश काढला की, "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" व ती चूक दुरुस्त करण्यासाठी तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. शरदरावजी पवार यांना त्यांच्या दालनातून सभागृहात यावे लागले, "**यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. जर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील.**" असे स्पष्ट आश्वासन गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ रोजी राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये दिल्यानंतर १५ वर्षाचा काळ उलटून गेला तरी मा. मुख्यमंत्र्यांच्या या आश्वासनाची अम्मलबजावणी आमच्या नोकरशाहीला करता आली नाही.

२.३ **नोकरशाहीने करायला नको ते करण्याचा सपाटा लावला** : जे करायला पाहिजे होते ते केले नाही आणि समझोत्यामध्ये, कायद्यामध्ये, नियमामध्ये, यु.जी.सी.च्या किंवा केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये, मान्य झालेल्या समग्र योजनमध्ये, अंतर्भूत नसलेल्या अनेक गोष्टी करण्याचा एकामागून एक सपाटा आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रामध्ये जो सुरू केला तो मा. मुख्यमंत्र्यांच्या उपरोक्त आश्वासनानंतर सुद्धा थांबला नाही. (१) "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला. (२) "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला. (३) त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश २० मार्च १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला. (४) त्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येवू नये. (५) त्यांना तदर्थ नेमणूका देण्यात याव्या. (६) त्यांची सेवा सेवाज्येष्ठतेसाठी धरु नये. अशा अनेक बेकायदेशीर अटी त्यानंतर लादल्या गेल्या. **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने यातील पोरकटपणा लक्षात आणून दिल्यावर पुढे हे सारे आदेश नोकरशाहीला मागे घ्यावे लागले, हा भाग वेगळा.**

२.४ **मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला** : मा. सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा एक महत्वपूर्ण धोरणात्मक निर्णय दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला. **हा निर्णय मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाशी १०० टक्के सुसंगत असा होता.** या निर्णयानुसार हे रेग्युलेशन शिफारशींच्या

# आंदोलन विशेषांक

स्वरुपाचे आहे. (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants i.e. candidates) लागू आहेत, असे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

**२.५ मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वरुप मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहाला विदित केले :** "नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणा-या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेकमेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारशी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणा-या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय;" या प्रश्नाला मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी एका शब्दात "**होय" असे ठाम उत्तर** मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी विधानपरिषदेत दिले.

**२.६ मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने**

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Affiliated to the All India Federation of University and College Teachers' Organisations (AIFUCTO)

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

| President | General Secretary |
|---|---|
| **Prof. C.R.Sadasivan** | **Prof. E.H.Kathale** |
| R.K.Gokuldham, A/205, S.V.Road, Borivli (West) | N/162, Reshimbagh, |
| Mumbai - 400 092. | Nagpur - 440 009. |
| Tel. : 022 - 2806 3667 / 5693 8030 | Tel. : 0712 2741098 |

**20 th APRIL 2009.**

**1.** Shri Ashok Chavan
Hon'ble Chief Minister Maharashtra State Mantralaya, Mumbai 400 032.

**2.** Shri Rajesh Tope
Hon'ble Minister for Higher & Technical Education Maharashtra State Mantralaya, Mumbai 400 032.

Hon'ble Sirs

At the meeting of the Executive Committee of the MFUCTO held in Mumbai on Sunday, 19 th April 2009, an important Movement Resolution was adopted in respect of University and College Teachers in our State. The Resolution is self-explanatory. A copy of the Resolution is enclosed for ready reference.

The Resolution consists of 7 paragraphs. Paragraphs 2.1 to 2.23 deal with the issue of NET/SET qualification; paragraphs 3.1 to 3.15 deal with the question of implementation of the Government of India order dated 31st December 2008 on revised scales of pay applicable to University and College teachers in accordance with the sixth pay commission recommendations. Para. 7 of the Resolution also deals with the Programme of Action.

MFUCTO has time and again requested the Government in the Department of Higher Education to give an appointment to the Executive Committee of the MFUCTO to meet to discuss and find solution to the pending issues. MFUCTO has not only submitted a Charter of Demands but also sent detailed explanatory notes on some of the issues. Unfortunately the government has not found time for the MFUCTO which is the State level Organization representing all the ten Non-Agricultural Universities in the State of Maharashtra, viz., Mumbai, Pune, SNDT, North Maharashtra, Shivaji, Nagpur, Amravati, Aurangabad, Nanded and Solapur. MFUCTO considers this neglect on the part of the Government a callous approach towards resolving the serious problems facing the University and College teachers in the State of Maharashtra.

We wish to inform your goodselves that it was the considered view of the Executive Committee of the MFUCTO in its Meeting held on 19.4.2009 that having adopted the afore-stated Resolution, the Programme of Action may be reconsidered only after the negotiated settlement of the issues involved in the agitation.

With warm regards,

Yours sincerely

(C.R.Sadasivan)
President

(E.H.Kathale)
General Secretary

**M F U C T O**

Copy forwarded with compliments to – **(1)** The Chief Secretary to Government of Maharashtra **(2)**The Principal Secretary to Government of Maharashtra Higher Technical Education Mantralaya,Mumbai 400 032. for information and necessary action.

(C.R.Sadasivan)
President

(E.H.Kathale)
General Secretary

**M F U C T O**

**आपली पावले मागे घेतली. :** सर्वोच्च न्यायालयाचा उपरोक्त निर्णय झाल्यानंतर खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाला त्यांची अनेक पावले मागे घ्यावी लागली. विद्यापीठ अनुदान आयोगाने मुळात **"नेटसेट असल्याशिवाय वरिष्ठ किंवा निवडश्रेणी दिली जाणार नाही" अशी भूमिका २४ डिसेंबर १९९८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद ८.४. मध्ये घेतली होती.** सेवेत भरती झाल्यावर, प्लेसमेंटच्या वेळी अशी अट लावल्यामुळे नेटसेटची अट पूर्वलक्षी प्रभावाने लावली जाते व तसे केल्याने, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिक्षेप होतो ही गोष्ट विधी सल्लागारांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून दिल्याने, नेटसेट बाबतच्या आपल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना आयोगाने रद्द केल्या व ४ एप्रिल २००० चे रेग्युलेशन समाविष्ट असलेली अधिसूचना निर्गमित केली.

"यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवडसमितीच्या मार्फत ज्यांची निवड झालेली आहे व **त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जे धारण करतात त्यांना नेटसेटच्या पात्रतेचा नियम लागू असणार नाही,"** अशी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ४ एप्रिल २००० च्या रेग्युलेशनमध्ये स्पष्ट तरतुद आहे. १९९९ पर्यंत महाराष्ट्रामध्ये अधिव्याख्यात्यांच्या भरतीसाठी कायद्याने ठरवून दिलेली किमान पात्रता काय होती याची पूर्ण माहिती असतांना महाराष्ट्रातील नोकरशाहीने मात्र याबाबतचा आपला दुराग्रह सतत चालूच ठेवला.

**२.७ कायदेशिररित्या नेटसेट पात्रता महाराष्ट्रात कशी लागू करता येईल?** : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक भरतीसाठी पात्रतेच्या अटी विद्यापीठांच्या **परिनियमांनी** किंवा राज्य शासनाने राजपत्रात प्रसिध्द केलेल्या **प्रमाणसंहितेने** किंवा मा. **कुलगुरुंच्या निदेशांनीच** विहित करता येतात या कायद्यातील तरतुदींची पूर्ण माहीती असतांना १९९९ च्या शेवटापर्यंत नेटसेटच्या पात्रतेच्या अटीबावत महाराष्ट्रातील नोकरशाहीने नुसत्या झोपा काढणेच पसंत केले.

**२.८ कायदेशीररित्या नेटसेट पात्रता परीक्षा महाराष्ट्रात केंव्हा लागू झाली?** : कायद्याने महाराष्ट्रात ही पात्रता परीक्षा डिसेंबर १९९९ मध्येच लागू झाली याची पूर्ण माहिती असतांना १९९१ ते १९९९ या कालखंडातील शिक्षकांना भरडण्याचे धोरण सोडायला आमची नोकरशाही तयारच नाही.

**२.९ मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले, ही चुक झालेली असल्यास आम्ही दुरुस्त करु, ही चुक झाली ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी मान्य केली :** ही चूक झाली असेल तर आम्ही दुरुस्त करु असे मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहात सांगितले होते. तिथून सात वर्षांनी दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी ही चूक झालेली आहे ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुढील शब्दात मान्य केली :- "सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते **असाधारण राजपत्रात** प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. **परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लीगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील."

**२.१० महाराष्ट्रात नेटसेट ही पात्रता परीक्षा केंव्हा सक्तीची झाली ते सुद्धा मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात सांगितले :** विधीवतरित्या नेटसेटची पात्रता १९९९ पर्यंत महाराष्ट्रात लागूच करण्यात आली नव्हती, एवढेच सांगून मा. उच्च शिक्षण मंत्री थांबले नाहीत तर ती केंव्हा पासून लागू करण्यात आली, हे सुध्दा त्यांनी त्याच दिवशी सभागृहात सांगितले. ते पुढील शब्दात :- "ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू करण्याची वेळ आली त्यावेळी दिनांक ११-१२-१९९९ रोजी मी शिक्षण मंत्री होतो त्यावेळी या संदर्भात विहित पध्दतीने विद्यापीठांना आदेश देण्यात आले होते. एवढेच नव्हे तर विद्यापीठ कायद्यात सुध्दा त्या संदर्भात आपण काही दुरुस्ती केली होती. त्याचा परिणाम असा झाला की १९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत."

**२.११ ही चुक झालेली आहे ही गोष्ट विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दुस-यांदा मान्य केली. :** "सभापती महोदय,... अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा **स्टॅट्युटमध्ये** किंवा व्हाईस चॅन्सेलरच्या **डायरेक्शन्समध्ये** किंवा गव्हर्नमेन्टच्या **कोड मध्ये** यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही" असे मा. विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी सभागृहात पुन्हा सांगितले.

***महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव***

उपरोक्त ठरावातील परिच्छेद ७ (३) पुढील प्रमाणे आहे. : "जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम ज्या कालखंडात होत आहे त्याच कालखंडात विद्यापीठ स्तरीय मेळाव्यांचे आयोजन विद्यापीठस्तरीय संघटनेकडून केले जाईल. या मेळाव्याला राज्यस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. या मेळाव्याचा कार्यक्रम महासंघाचे अध्यक्ष व सचिव यांनी ठरविल्याप्रमाणे असेल. कोणत्याही परिस्थितीत हा कार्यक्रम ३० मे, २००९ या तारखेच्या पुढे जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल." या मेळाव्याचा महासंघाचे अध्यक्ष व सचिव यांनी ठरविलेला व कार्यकारी मंडळाने सम्मत केलेला कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.:-

## *विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या विद्यापीठस्तरीय मेळाव्यांचे आयोजन : कार्यक्रम*

| | | | |
|---|---|---|---|
| १. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई. | ज्युहू कॅम्पस्, मुंबई | २९ एप्रिल, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| २. पूणे विद्यापीठ, पूणे. | सारडा कॉलेज, अहमदनगर | २ मे, २००९ | दुपारी १२.०० वाजता |
| ३. मुंबई विद्यापीठ, मुंबई. | कालीना कॅम्पस्, मुंबई | ४ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| ४. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, | ८ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| ५. डॉ. बा.आ. मराठवाडा विद्यापीठ व<br>६. स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. | देवगीरी महाविद्यालय,<br>औरंगाबाद | १२ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| ७. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. | सेमीनार सभागृह, जळगाव | १७ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| ८. सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | २२ मे २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| ९. रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर. | गुरुनानक भवन, नागपूर | २३ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| १०. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. | छत्रपती शिवाजी नाईट महाविद्यालय, सोलापूर | २४ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |

# मंगळवार, दिनांक १४ जुलै २००९ रोजी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक बेमुदत काम बंद आंदोलनास सुरुवात करतील.

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ७ (८) पहा)*

**२.१२ तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सांगितले तीन महिन्यात चूक दुरुस्त करणारा शासननिर्णय काढतो.** : "पण तदर्थ स्वरुपाच्या नेमणूका देणे, वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे इ. अटी यु.जी.सी. ने व केंद्र शासनाने घातलेल्या नाहीत .... **तेव्हा या वरील अटी रद्द करणार आहात काय ते सांगा.**" या प्रश्नाला तत्कालीन मा.उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी **एका शब्दात ठामपणे "होय" असे उत्तर दिले** व तीन महिन्यामध्ये निर्णय घेऊ असेही स्पष्टपणे सांगितले होते. तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्यापैकी ३ अटींचे दफन केले पण वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीबाबत नोकरशाहीने त्यांच्यावर मात केली. 'त्या' अटींचे दफन त्यांना करता आले नाही.

**२.१३ विद्यमान मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले २४ डिसेंबर २००८ च्या पूर्वी चूक दुरुस्त करणारा शासननिर्णय काढतो.** : या सर्व बाबी समजून घेतल्यानंतर या विभागाचे मंत्री या नात्याने विद्यमान उच्च शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात १७ डिसेबर २००८ रोजी शासनाच्या वतीने २४ डिसेंबर २००८ च्या आत याबाबतचा जी. आर. काढू असे सांगितले.

**२.१४ विद्यापीठ अनुदान आयोगाला सल्ला मिळाला मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करा** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पातळीवर खुपच विलंब झाल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने जो पत्रव्यवहार केला, त्यामध्ये ३ ऑगस्ट २००५ रोजी एक पत्र पाठवून या महासंघाला विद्यापीठ अनुदान आयोगाने पुढील प्रमाणे कळविले :-

"However, the matter was referred to our legal Consultant also, who has also suggested that the UGC should consider the cases for selection of various candidates on merit within the parameters of relaxation as contemplated under the UGC regulations of 1991 and 2000 if applications are forwarded by the College/Institution through the University **as directed by the Bombay High Court.**" याचा अर्थ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विधीसल्लागारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करा असा सल्ला विद्यापीठ अनुदान आयोगाला दिला.

**२.१५ पुढच्या बारा महिन्यातील नेट-सेटची प्रकरणे पाठवा असे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सांगितले तर यांनी सोबतच मागच्या १२ वर्षातील प्रकरणे पाठविली.** : मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २००१ च्या याचिका क्रमांक ५०२२ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :-

"We also hold that the cases of candidates appointed **from 12th October, 1999 till 18th October, 2000** are required to be examined so as to ascertain the applicability of the first proviso to clause 2 of the 1991 Regulations as well as 2000 Regulations before their services are sought to be terminated by the respective universities and/ or colleges/ institutions." याचा अर्थ "१२ ऑक्टोबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००० या काळातील प्रकरणांची छाननी करावी" असा हा निर्णय आहे.

**२.१६ मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने १०४ प्रकरणे पाठवा असे सांगितले तर यांनी हजारो प्रकरणे पाठविली.** : मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :- "In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a **period of four weeks from the date of communication** by UGC to the college through the University. **In the result the petitions mentioned in the schedule to this order are disposed of by this order.....** Except those petitions mentioned to be heard separately, rest of the petitions mentioned in the schedule are covered by this order and are accordingly disposed." या निर्णयात शेवटी **परिशिष्ट** देण्यात आले असून त्या **परिशिष्टात दिलेल्या १०४ प्रकरणांची छाननी** करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घ्यावा असे नमूद असतांना

### *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार महासंघाचे अध्यक्ष व सचिव यांनी ठरविलेला व कार्यकारी मंडळाने सम्मत केलेला नागपूर व अमरावती येथील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्याचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्या प्रमाणे आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **सचिव, 'नुटा'**

**तक्ता**

## नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्यांचे आयोजन

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | गुरुनानक भवन नागपूर, | शनिवार, दिनांक २३ मे, २००९ | दुपारी ४.०० वाजता |
| संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | शुक्रवार, दिनांक २२ मे २००९ | दुपारी ४.०० वाजता |

# सोमवार, दिनांक ६ जुलै २००९ रोजी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे एक दिवसाचे 'सामुहिक रजा आंदोलन'

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ७ (७) पहा)*

त्या निकालाचे निमित्त करुन हजारो प्रकरणांना वॅगा भरभरून आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रातून दिल्लीला कां पाठविले हे समजण्या पलिकडचे आहे.

२.१७ **शेवटी आता विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय दिला :** खरे म्हणजे नेटसेट पात्रता ज्या राज्यात कायद्याने सक्तीची केली आहे तेथेच फक्त नेटसेट पात्रतेपासून एक्झमशन मिळण्यासाठी प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविणे आवश्यक असते. १९९१ ते १९९९ या काळात ही पात्रता परीक्षा कायद्याने महाराष्ट्रात सक्तीची करण्यात आलेलीच नव्हती. तरीही केवळ आमच्या नोकरशाहीने आकसापोटी अशी हजारो प्रकरणे पाठविली. उशिरा कां होईना आता विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय दिला तरी नोकरशाहीची झोप काही उघडत नाही. ७ व ८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला आहे तो पुढील प्रमाणे :- "**The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had continued service of 5 or more years the NET /SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :-** (i) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee. (ii) The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections."

२.१८ **विद्यापीठ अनुदान आयोगाने आपला धोरणात्मक निर्णय महाराष्ट्रातील विद्यापीठांना कळविला.** : हजारो शिक्षकांशी महाराष्ट्रातील नोकरशाहीने गेली १५-२० वर्षे चालविलेला हा छळ आता तरी थांबेल असे वाटले, कारण विद्यापीठ अनुदान आयोगाने काय निर्णय दिलेला आहे हे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी स्वतः पुढील शब्दात सभागृहात सांगितले :-"विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रात नमूद केलेल्या खालील अटीनुसार एकूण ८३७ शिक्षकांना नेट/सेट पात्रतेपासुन सुट देण्यात येत असल्याचे विद्यापीठांस कळविले आहे."

२.१९ **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयावर मा. उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले :** विद्यापीठ अनुदान आयोगाने ५ नोव्हेंबर २००८ च्या आदेशाने जो धोरणात्मक निर्णय कळविला त्याबाबतीत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08,4486/ 2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणात दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी पुढील धोरणात्मक निर्णय दिला :-

"**So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission's decision in its meeting dated 7th and 8th October 2008.** If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, **undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC**" खरे म्हणजे हायकोर्टाचा हा निर्णय झाल्याबरोबर आमच्या नोकरशाहीने त्याबाबतची पुढील कारवाई पार पाडायला पाहिजे होती पण तसे झाले नाही.

२.२० **मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले "तीन महिन्यात या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."** : मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात १७ डिसेंबर २००८ रोजी शासनाच्या वतीने पुढील प्रमाणे निर्णय घोषित केला :-

"**सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या संदर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे** तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी.आर. काढण्यात येईल, जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.... **तसेच** हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल." पुढे त्यांनी असेही सांगितले की, "हे करिअर अॅडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल." राज्याच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी स्पष्टपणे सभागृहात उपरोक्त घोषणा केल्यानंतर तरी ही साठा उत्तराची कहाणी संपायला पाहिजे कां नको? पण तसे झालेले नाही.

२.२१ **तदर्थ नेमणूकांची केवढी 'गोडी'?** : स्वतः कायम स्वरुपी नेमणूकीने आपल्या पदावर विराजमान झालेल्या कोणत्याही नोकरशहाला इतरांची नेमणूक 'तदर्थ' ठेवण्यात फार मोठी 'गोडी' वाटते. चॅन्सेलरच्या मान्यतेने करण्यात आलेल्या परिनियमाप्रमाणे दोन वर्षे पूर्ण होताच १९९१ ते १९९९ या कालखंडात सेवेत आलेल्या अधिव्याख्यात्यांना कन्फर्म करण्यात आलेले आहे, एवढे समजून घेण्यास्तव परिनियम वाचण्यासाठी सुद्धा त्यांच्याजवळ वेळ नसतो, हे एकदा समजून घेता येईल. शासननिर्णयांनी त्यांच्या सेवाशर्ती ठरत नाहीत एवढा कायदा जाणून घेण्यासाठीही त्यांच्याजवळ वेळ नसतो, हेहि एकदा समजून घेता येईल. त्यांच्या नेमणूका तदर्थ करा अशी तरतुद करणारा १९९५ चा बेकायदेशीर शासननिर्णय २००१ च्या दुस-या एका शासननिर्णयाने दफन केलेला आहे, हे सुद्धा २००९ मध्ये या नोकरशाहीला ठावूक असू नये हे मात्र

ADDITIONAL AGENDA

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION**

**to be held at 12.00 noon on *SUNDAY, the***

***10 th May, 2009 at* Shri. Narendra Tidke College of Arts & Commerce, RAMTEK**

**विषय क्रमांक ७०२ :**

***महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा आंदोलनाचा ठराव***

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे महासचिव प्रा.डॉ. एकनाथ कठाळे व सहसचिव प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव विचारात घेण्यात यावा.

*नोट :- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव याच बुलेटीनच्या पृष्ठ ८९ ते ९८ वर प्रसृत करण्यात आला आहे.*

**सोमवार, दिनांक १५ जून २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता त्या त्या विभागातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयासमोर निदर्शने करतील व त्यांच्यामार्फत मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना आंदोलनाची प्रथम सूचना देतील.**

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ७ (५) पहा)*

मती गुंग करणारे तर आहेच पण किती उथळ लोकांच्या हाती हे सारे सुत्र संचालन आलेले आहे याचाही तो एक पुरावा आहे.

२.२२ **नेटसेटच्या पात्रतेचा गोंधळ असाच चालु रहाणार काय?** : नेटसेटच्या पात्रता अटीविषयी गेल्या १०-१५ वर्षात आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रात जो गोंधळ घातला आहे तसाच किंवा त्या प्रकारचा गोंधळ पुढची १०-१५ वर्षे सुरु ठेवण्याच्या उद्योगाला आमची नोकरशाही लागलेली आहे, असे स्पष्टपणे दिसून येते. विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६ च्या खंड २० च्या उपखंड १ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन केंद्र शासनाने १२ नोव्हेंबर २००८ रोजी एक आदेश पारित केला. हा आदेश केंद्र शासनाच्या वकिलांनी शपथपत्रावर मा. उच्च न्यायालयासमोर २४ नोव्हेंबर २००८ रोजी दाखल केला. गोष्ट एवढ्यावरच थांबली नाही, तर त्यावर २७ नोव्हेंबर २००८ रोजी मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिला. हा निर्णय समजण्याइतकी बुद्धी व एकदा तो निर्णय समजल्यावर "हा हायकोर्टाचा निर्णय आहे" एवढे सांगण्याइतके धैर्य असलेल्या व्यक्तिंचा सर्व स्तरावरच्या नोकरशाहीमध्ये तुटवडा असल्यामुळे हा गोंधळ सहज आणखी १०-१५ वर्षे पुढे असाच चालू राहील असे गेल्या १०-१५ आठवड्यातील घटनांवरून दिसून येते.

२.२३. **नेट-सेट पात्रता नसलेल्या सा-या शिक्षकांना एका गटातील समजून वागणूक देता येणार नाही** : पहिला गट १९९१ ते १९९९ या काळातील आहे, ज्यांना ही पात्रता कायद्याने लागूच केलेली नव्हती, हे एक व त्यांच्या नेमणूकासुद्धा तदर्थ नसून आज कायमस्वरुपी झालेल्या आहेत, त्यांची विधिवतरित्या निवडसमितीमार्फत निवड झाली होती व ते विधिमय पात्रता धारक सुद्धा होते. महाराष्ट्र शासनाच्या नोकरशाहीने याबाबत वारंवार भूमिका बदललेल्या आहेत. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याबाबतची आपली भूमिका सुरुवातीपासून ठामपणे मांडली आहे व कायम ठेवली आहे. दिनांक ३० मार्च २००३ रोजीच्या पत्रान्वये महासंघाने विद्यापीठ अनुदान आयोगाला ही भूमिका कळविली होती. शासनाला सुद्धा वेळोवेळी व कितीतरी वेळा ही भूमिका कळविलेली आहे. ढोबळमानाने ती पुढील प्रमाणे सांगता येईल. :-

"Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, the State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultaneously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument , hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999. Advertisements were approved, Selections were made, approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers, year after years and continued to be so paid even today. " कमीजास्त शब्दात महाराष्ट्रातील निरनिराळ्या विद्यापीठांच्या मा. कुलगुरुंनी व कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला अशीच भूमिका कळविलेली आहे. दुसरा गट डिसेंबर १९९९ नंतरच्या काळातील आहे. त्यांच्या बाबतीत प्रत्येक प्रकरणी ते प्रकरण नियमित करुन घेण्याची कारवाई विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे पार पाडावी लागेल.

**सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या बाबतीत**

३.१ ज्या प्रकारच्या दिरंगाईने परिपूर्ण व आकसाने ओतप्रोत भरलेली बेदरकारवृत्ती आमच्या नोकरशाहीने नेटसेट पात्रता परीक्षेबाबत दाखविली त्याच प्रकारच्या वृत्तीचे ओंगळवाणे प्रदर्शन विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत मोठ्या प्रमाणात केलेले आहे. मंत्रिमंडळाचे या संदर्भातील निर्णय अमलात आणायचे नाहीत व शिक्षकांना अवमानित करुन जणू काही ते चातुर्वर्णापैकी चौथ्या वर्गातील असहाय्य नागरिक आहेत असा देखावा उभा करण्याच्या नोकरशाहीच्या आढ्यतापूर्ण वागणूकीचे विश्लेषण होणे आवश्यक आहे.

३.२ **सुरुवातीपासूनच घटनात्मक तरतुदीमुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वेतन आयोग नव्हता** : केंद्र शासनाचे वेतन आयोगाविषयीचे निर्णय झाले की मग १९६६ व १९७६ च्या काळामध्ये महाराष्ट्रात वेतन आयोग बसविला जात असे व त्यानंतर राज्य शासकीय कर्मचा-यांना वेतनश्रेण्या लागू केल्या जात असत. "Co-ordination of standards and determination of standards in higher education" हा विषय भारतीय संविधानाच्या परिशिष्ट सात मधील पहिल्या सूचित ६६ व्या क्रमांकावर केंद्र शासनाच्या अखत्यारित दिलेला असल्यामुळे त्या काळात सुद्धा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या व केंद्र शासनाने मान्य केलेल्या वेतनश्रेण्या थेट लागू केल्या जात असत. या घटनात्मक तरतुदीमुळे राज्य शासकीय कर्मचा-यांना १९७६ पासून वेतनश्रेण्या लागू करण्यात आल्या असल्या तरी त्यावेळी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मात्र त्या १९७३ पासून लागू करण्यात आल्या होत्या.

३.३ **राज्य मंत्रिमंडळाचा १९७७ चा धोरणात्मक निर्णय** : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या करिता राज्यस्तरीय वेतन आयोग केंव्हाही बसविण्यात आला नाही तो उपरोक्त घटनात्मक तरतुदीमुळेच होय. राज्य शासकीय कर्मचा-यांच्या करिता १९७६ चा भोळे वेतन आयोग हा शेवटचा राज्यस्तरीय वेतन आयोग होता. याचे कारण म्हणजे त्या वेळच्या शासनाने घेतलेला धोरणात्मक निर्णय होय. "राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचा-यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा **त्या वेतन आयोगाच्या शिफारशी वरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय** (Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales) **राज्य शासकीय**

**सोमवार, दिनांक २२ जून २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता त्या त्या जिल्ह्यातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करतील व त्यांच्यामार्फत राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना आंदोलनाची दुसऱ्यांदा सूचना देतील.**

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ७ (६) पहा)*

**उच्च शिक्षण ही दुय्यम दर्जाची व्यवस्था समजून त्यात काम करणाऱ्या शिक्षकांना कस्पटासमान लेखण्याच्या नोकरशाहीच्या वृत्तीची तीव्र निर्भत्सना करण्यात येत आहे.**

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ६ पहा)*

**कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल."** असा धोरणात्मक निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये राज्यशासनाने घेतला होता. आजपावेतो या धोरणात्मक निर्णयामध्ये राज्य शासनाच्या स्तरावर बदल झालेला नाही.

३.४ **राज्य मंत्रिमंडळाचा सन २००८ चा सहाव्या वेतन आयोगाबाबतचा धोरणात्मक निर्णय :** सन १९७७ मध्ये मंत्रिमंडळाने घेतलेला धोरणात्मक निर्णय आजही अस्तित्वात असल्यामुळे सन २००८ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने अनुषंगिक व सुसंगत असा धोरणात्मकच निर्णय घेतला. वेतन सुधारणेची प्रक्रिया होत असतांना "**वेतन सुधारणापूर्व अग्रिम**" देण्याचा हा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला व त्यामध्ये सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांना व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसह सर्व स्तरावरच्या इतर पात्र कर्मचा-यांना तो निर्णय लागू केला.

३.५ **मंत्रिमंडळाच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे वेतन सुधारणापूर्व अग्रिमाचा शासननिर्णय निर्गमित झाला :** सन २००८ मध्ये मंत्रिमंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार "सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापूर्व अग्रीम अदा करण्याबाबत" या विषयावरील शासननिर्णय दिनांक ६ ऑक्टोबर २००८ रोजी निर्गमित झाला. या शासननिर्णयातील पहिला परिच्छेद पुढील प्रमाणे आहे:- "याबाबत शासन आता असे आदेश देत आहे की, दिनांक ०१ एप्रिल, २००८ रोजी **जे कर्मचारी** नियमित वेतनश्रेणीत वेतन घेत होते व दिनांक १ ऑक्टोबर, २००८ रोजी शासन सेवेत कार्यरत आहेत अशा राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना त्यांच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २००८ रोजी अनुज्ञेय असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीतील मुळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यास शासन मंजुरी देत आहे." या शासननिर्णयातील परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे :- "वरील अग्रीमाची रक्कम सहाव्या वेतन सुधारणेनुसार अनुज्ञेय सुधारित वेतन संरचनेच्या (Pay Structure) अनुषंगाने यथास्थिती देय वेतनातून/थकबाकीतून वसूल करण्यासंबंधीच्या कार्यपद्धतीबाबत स्वतंत्रपणे आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील." त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद सहामध्ये "हे आदेश जिल्हा परिषदा, **कृषीत्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये,** कृषी विद्यापीठे आणि शासन अनुदानित शैक्षणिक संस्थामधील **कर्मचा-यांना** योग्य त्या फेरफारासह लागू राहतील." अशी तरतुद आहे. या शासननिर्णयानुसार सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना हा अग्रिम देण्यातही आला. मंत्रिमंडळाने उपरोक्त निर्णय घेतल्यानंतर सुद्धा **नोकरशाहीच्या आकसपूर्ण वागणूकीने ज्यांना वेतन सुधारणापूर्व अग्रिम मिळाला पण वेतनसुधारणा मात्र मिळालेली नाही असा हा एकमेव वर्ग आता महाराष्ट्रात अस्तित्वात आहे.**

३.६ **मंत्रिमंडळाच्या धोरणात्मक निर्णयाचा मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी केलेला सार्थ उल्लेख :** राज्य मंत्रिमंडळाने हा जो धोरणात्मक निर्णय घेतला त्याचा अतिशय सार्थ उल्लेख मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी लक्षवेधी सुचनेवरील निवेदनामध्ये पुढील शब्दात केला. :-

"वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ६.१०.२००८ अन्वये ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने **वेतन सुधारणापूर्व अग्रिम** राज्यातील सर्व विद्यापीठाच्या व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना अदा करण्यात आलेला आहे."

३.७ **मा. राज्यमंत्री उच्च शिक्षण यांनी केलेला साभिमान उल्लेख :** मंत्रिमंडळाने धोरणात्मक निर्णय घेतलेला असल्यामुळे, वेतनसुधारणापूर्व अग्रिम देऊ पण वेतन सुधारणा मात्र देता येणार नाही असा बिनडोकपणाचा अर्थ काढता येत नसल्यामुळे, विधानपरिषदेमध्ये उपरोक्त चर्चेमध्ये राज्याच्या मा. उच्च शिक्षण राज्यमंत्र्यांनी याबाबीचा मोकळेपणाने साभिमान उल्लेख केला तो पुढील शब्दात :-

"सहावा वेतन लागू करण्यापूर्वी शासनाने दिवाळीला सर्व कर्मचा-यांना कमीत कमी १० हजार व जास्तीत जास्त दोन मूळ वेतन इतका अग्रिम दिलेला आहे. असा निर्णय घेणारे हे एकमेव राज्य आहे. या शासनाने चांगले काम केलेले आहे."

३.८ **मा. उच्च शिक्षणमंत्री व राज्यमंत्री यांनी दिलेली आश्वासने :** सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषदेमध्ये मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. राज्यमंत्री यांनी पुढील प्रमाणे आश्वासने दिलीत.:-

(अ) "वेतन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत त्याबाबत सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांबाबत ज्यावेळी महाराष्ट्र शासन निर्णय घेईल त्यावेळी शिक्षक आणि उच्च शिक्षण विभागातील जे कर्मचारी आहेत यांचेही त्यांच्याबरोबर करुन घेऊ."

(ब) "एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील."

(क) "युजीसीकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल."

३.९ **संघटनेच्या महासचिवांनी ही बाब मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली होती :** आमच्या संघटनेच्या महासचिवांनी दिनांक २० डिसेंबर २००८ रोजी एकदा व त्यानंतर १२ जानेवारी २००९ रोजी दुस-यांदा निवेदन देऊन, गेल्या अनेक वर्षापासून विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक नोकरशाहीच्या अहंकारी वृत्तीने पिडीत आहेत ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली होती. या दोनही निवेदनात अशी विनंती केली होती की,

" महाराष्ट्रामध्ये २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतन पुनर्रचनेचा शासन निर्णय (ज्याबद्दल केन्द्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होत नाही) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवत असतांना त्याच वेळी महाराष्ट्रामधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचे शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव सुध्दा मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येतील याची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना विभागाला देण्यात याव्यात. "

**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिक्षेप करण्याच्या व मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाविषयी व मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनासंबंधी तुच्छतेची भावना मनात बाळगण्याच्या नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा तीव्र धिक्कार**

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ७ पहा)*

**३१ मार्च २००९ च्या आत सहजपणे मिळू शकणारे हे केंद्राचे करोडो रुपयाचे अर्थसहाय्य दिल्लीवरुन आणण्यासाठी महाराष्ट्रात कोणालाही वेळ नाही असे मोठे विचित्र चित्र आज उभे झालेले आहे.**

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद ३.१५ पहा)*

**३.१० केंद्राचा शासननिर्णय ३१ डिसेंबरलाच राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविण्यात आला :** दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी केंद्र शासनाचा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन सुधारणेचा शासन निर्णय निर्गमित झाला. केंद्र शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजीच सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून हा शासननिर्णय जोडून पाठविला. केंद्र शासनाच्या प्रेस इन्फर्मेशन ब्युरोनी १२ फेब्रुवारी २००९ रोजी मानव संसाधन विभागाच्या वतीने एक जाहीर वृत्त प्रसारण काढले त्यात असे नमूद केले आहे की, "Copies of the said communication were endorsed, among others, **to Chief Secretaries of State Governments with clear advice in regard to what the State Governments are expected to do in order to be eligible for Central assistance......**"

**३.११ केंद्राने कळविले की आता कोणत्याही कागदपत्राची वाट पाहू नका :** या केंद्र शासनाच्या उपरोक्त प्रसारणामध्ये असेही नमूद करण्यात आलेले आहे की, "In view of this, no separate order is required to be issued to State Governments." त्यातच पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की "The scheme contains a provision that the revised pay and applicable allowances as also arrears up to 40% of the total arrears could be paid to all eligible beneficiaries under the scheme, pending issuance of regulations by the UGC." सारांश काय तर महाराष्ट्र शासनाला केंद्र सरकारने स्पष्टपणे कळविले की, "तुम्ही याबाबतची कार्यवाही तावडतोब सुरु करा. आता तुम्ही कोणत्याही नवीन कागदपत्रांची वाट पाहू नका. ८० टक्के अर्थसहाय्य देण्यास आम्ही तयार आहोत, राज्य शासनाने या वर्षात ४० टक्के थकबाकी देण्यासाठीची रक्कम आमचेकडून न्यावी व याबाबतची कार्यवाही ३१ मार्च, २००९ च्या आत पार पाडावी."

**३.१२ विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविले अर्थसहाय्य उपलब्ध करुन घ्या, थकबाकी द्या :** विद्यापीठ अनुदान आयोगाने २८ फेब्रुवारी, २००९ रोजी सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना पत्र लिहिले. त्याचा पत्र क्रमांक No.F.1.1-61/2009/PRC असा आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "The Commission has received orders from the Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education, New Delhi vide letter No. 1-32/2006-U.II/U.I (i) and 1-32/2006-U.II/U.I (ii) dated 31st December, 2008 on the above subject and to say that the **State Government may take action to adopt the above Government of India scheme for State Universities and Colleges and payment of pay scales, enhancement of retirement age and release of 40% of the arrears during the current financial year in accordance with these provisions.**" दिनांक ३१ मार्च, २००९ च्या आत ४० टक्के थकबाकीची रक्कम घेवून जावी असे स्पष्टपणे केंद्र शासनाने कळविले, विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविले, आमच्या या राज्यातील नोकरशाही पूर्णपणे झोपलेली आहे, त्यांना याबाबत काही करावेसे वाटतच नाही. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना **दिली जाणारी ही वागणूक मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा अधिक्षेप करणारी व मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांचा भंग करणारी आहे, असे या कार्यकारी मंडळाचे मत आहे.**

**३.१३ मंत्र्यांनी आश्वासन दिले पण नोकरशाही हलायला तयारच नाही :** सुधारित वेतनश्रेण्या लागु करावयाच्या तर त्याबाबतचे प्रस्ताव राज्याच्या वित्त विभागाला सादर करावे लागतात. २९ डिसेंबर २००८ रोजी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या या मागणीबाबत विधानपरिषदेत स्पष्टपणे असे नमूद केले होते की "महासचिव, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २०.१२.२००८ रोजी शासनास सादर केलेल्या निवेदनातील मागणी अनुषंगाने **वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात येईल.**" आमच्या नोकरशाहीला लागलेली झोप एवढी गाढ आहे की आपल्या मंत्र्यांनी सभागृहात असे आश्वासन दिले आहे हे त्यांच्या गावीच नाही. ३१ डिसेंबरचा केंद्र शासनाचा शासननिर्णय केंद्राने त्याच तारखेला महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना सपत्र अग्रेषित केला, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या महासचिवांनी १२ जानेवारी २००९ च्या पत्रान्वये ३१ डिसेंबरच्या शासननिर्णयाची अधिकृत प्रत महाराष्ट्र शासनाला सादर केली, २८ फेब्रुवारी २००९ ला विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्याच्या शिक्षण सचिवांना पत्र लिहिले, एवढ्या उपर तरी आमच्या नोकरशाहीने वित्त विभागाला प्रस्ताव सादर केला काय? तर या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे.

**३.१४ वित्तमंत्र्यांना यातले काहीच माहिती नाही हे खुद्द वित्तमंत्र्यांनीच सभागृहात मान्य केले :** विधानपरिषदेत अतिरिक्त अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेच्या वेळी काही सदस्यांनी अर्थसंकल्पीय भाषणातून या बाबी मा. अर्थमंत्र्यांच्या लक्षात आणून दिल्या. मा. अर्थमंत्र्यांनी १९ मार्च २००९ रोजी उत्तराचे जे भाषण केले ते काळजीपूर्वक वाचले तर त्यांना यातील काहीच ठाऊक नव्हते असे दिसून येते. २८ फेब्रुवारीला विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षण सचिवांना जे पत्र पाठविले "त्याची प्रत माझेजवळ आहे. ते तुम्हाला ३१ मार्च पर्यंत ८० टक्क्यापैकी ४० टक्के रक्कम देण्यास तयार आहेत आणि यासंदर्भात त्यांनी फेब्रुवारीमध्ये पत्र पाठविलेले आहे. **आपण तो निधी ३१ मार्चच्या आत राज्य शासनाच्या ताब्यात आला पाहिजे या बाबतीत व्यवस्था करणार आहात काय? एवढाच माझा प्रश्न आहे.**" असे विचारले तेंव्हा मा. अर्थमंत्र्यांनी जे उत्तर दिले ते शब्दशः पुढील प्रमाणे "**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, मी कालच सन्माननीय सदस्यांकडे त्या पत्राची प्रत मागितली होती. आपण भाषण करीत होता, त्यामुळे कदाचित ती प्रत द्यावयाची राहून गेली असेल. **आपण ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे. मी जरुर याबाबतीत लक्ष घालतो.**" सभागृहातच हे पत्र त्यांच्या सुपूर्द करण्यात आले, पण याचा अर्थ सरळ असा आहे की आमच्या नोकरशाहीने, उच्च शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात कबूल केल्यानंतरसुद्धा, वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला नव्हता, केंद्र शासनाच्या प्रस्तावावर कोणतीही कारवाई केली नव्हती.

**३.१५ ३१ मार्च २००९ च्या आत मिळणारे ४० टक्के अर्थसहाय्य आणण्यास कोणालाच वेळ नाही :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची मुख्य तक्रार अशी आहे की एक रुपयाचे अर्थसहाय्य मिळत नसतांना डिसेंबर २००८ मध्ये सादर झालेल्या हकिम समितीच्या अहवालावर निर्णय होऊन १७ लाख कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेण्या लागू करणारा शासननिर्णय २७ फेब्रुवारीला निर्गमित होतो, पण त्याच डिसेंबर महिन्यात केंद्र शासनाचा शासननिर्णय निर्गमित होवून, ज्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत घटनात्मक कर्तव्य या नात्याने ८० टक्के अर्थ सहाय्य केंद्र शासन देणार आहे, आता कोणत्याही कागदपत्राची वाट पाहू नका, ४० टक्के थकीत बाकी मार्च २००९

**पुढच्या बारा महिन्यातील नेट-सेटची प्रकरणे पाठवा असे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सांगितले तर यांनी सोबतच मागच्या १२ वर्षातील प्रकरणे पाठविली.**

*('एम्फक्टो'च्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या आंदोलन ठरावातील परिच्छेद २.१५ पहा)*

च्या आत शिक्षकांना देण्यासाठी आमच्या कडून घेऊन जा, असे वारंवार केंद्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोग सांगत असतांना व मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात तशी आश्वासने दिली असतांना आमची नोकरशाही जागची हलायलाच तयार नाही व **३१ मार्च २००९ च्या आत सहजपणे मिळू शकणारे हे केंद्राचे करोडो रुपयाचे अर्थसहाय्य दिल्लीवरुन आणण्यासाठी महाराष्ट्रात कोणालाही वेळ नाही असे मोठे विचित्र चित्र आज उभे झालेले आहे.**

### इतर मागण्या

**४. चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा मार्गच बंद झालेला आहे :** चर्चेच्या माध्यमातून प्रश्न निकाली काढण्याची एक मोठी परंपरा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला लाभलेली आहे. निरनिराळ्या दोन माजी मुख्यमंत्र्यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा घडवून आणल्या. यातील काही चर्चा अनेक वेळा, अनेक दिवस व अनेक तास झाल्या व त्याची अधिकृत कार्यवृत्ते महासंघाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. अनेक माजी उच्च शिक्षण मंत्र्यांनी या कार्यकारी मंडळाशी अनेकदा चर्चा घडवून आणल्या, एका माजी शिक्षणमंत्र्यांनी तर महासंघाच्या किम्मतराय बिल्डींगमधील कार्यालयात हजर होऊन महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा केली होती. सचिवांशी चर्चा तर कितीतरी वेळा झालेल्या आहेत. महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या अनेक समस्या व मागण्यांच्या संदर्भात शासनाशी चर्चा ही अलीकडे पूर्णपणे बंद झालेली आहे. वेळोवेळी धरणे, मोर्चे, निदर्शने, निवेदने, या माध्यमातून चर्चेची मागणी करण्यात आली पण त्याला शासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. याबाबतचे शेवटचे निवेदन या महासंघाच्या अध्यक्षांनी १६ फेब्रुवारी २००९ रोजी शासनाला सादर केले असून सोबत मागणी पत्रक सुद्धा जोडलेले आहे.

५. ११ जानेवारी ते १८ जानेवारी १९८९ या काळात दररोज मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीत केंद्र शासनाची वेतन सुधारणा **एक समग्र योजना** म्हणून लागू करण्याचा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी समझोता होणे, समग्र योजनेत नसलेल्या अर्धा डझनाच्यावर बेकायदेशीर अटी लादण्याचा त्यानंतर घडलेला प्रकार, त्या अटी बेकायदेशीर असल्याने नंतर शासनाला त्या मागे घ्याव्या लागणे, या समग्र योजनेत अंतर्भूत असल्याप्रमाणे नेटसेट परीक्षा सक्तीची करण्याची कारवाई १९९९ पर्यंत महाराष्ट्रात पार पाडली न जाणे, पूर्वीच सेवेत भरती झालेल्या शिक्षकांना नेटसेटची पात्रता परीक्षा लागू होत नसेल तर त्याबाबतची चूक दुरुस्त करण्यात येईल, असे मा. मुख्यमंत्र्यांनी १७ मार्च १९९४ रोजी सांगूनसुद्धा १५ वर्षाचा काळ गेला तरी ती चूक दुरुस्त न होणे, नेटसेट बाबतची अट शिफारशीच्या स्वरुपाची आहे ती पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे, तर भावी प्रभावाने लागू करावी लागेल, असा मा. सर्वोच्च न्यायालयाने ८ सप्टेंबर १९९४ रोजी दिलेला निर्णय, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे ही गोष्ट मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी सभागृहात मान्य करणे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाने मुळात "नेटसेट असल्याशिवाय वरिष्ठ किंवा निवडश्रेणी दिली जाणार नाही" अशी भूमिका २४ डिसेंबर १९९८ च्या (विद्यापीठ अनुदान आयोगाच्या) अधिसूचनेच्या परिच्छेद ८.४ मध्ये घेतली होती, ती त्यांनी मागे घेणे, १९९१ च्या नेटसेट बाबतच्या आपल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना रद्द करणे व ४ एप्रिल २००० चे नवे रेग्युलेशन अधिसूचनेसह निर्गमित करणे, ४ एप्रिल २००० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये "यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवडसमितीच्या मार्फत ज्यांची निवड झालेली आहे व **त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जे धारण करतात त्यांना नेटसेटच्या पात्रतेचा नियम लागू असणार नाही,**" अशी स्पष्ट तरतुद असणे, विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार नेटसेटची परीक्षा भरतीपूर्व पात्रता परीक्षा म्हणून डिसेंबर १९९९ पूर्वी महाराष्ट्रात विधिवतरित्या लागू करण्यात न येणे, ही राज्य सरकारकडून त्यावेळी झालेली चूक आहे असे तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी ३ ऑगस्ट २००१ रोजी विधानपरिषदेत मान्य करणे, विधिवतरित्या नेटसेट पात्रता परीक्षा डिसेंबर १९९९ मध्ये सक्तीची करण्यात आली, अशीही माहिती मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्याच दिवशी सभागृहात देणे, विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी सुद्धा त्यावेळी राज्य शासनाची चूक झाली होती हे १७ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषद सभागृहात मान्य करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाकडे नेटसेटची अट शिथिल करण्याबाबत पात्रता परीक्षा सक्तीची झाल्यानंतरच्या १२ महिन्यातील (१९९९ ते २०००) प्रकरणे पाठवा, असा मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २० फेब्रुवारी २००२ रोजी निर्णय देणे, १०४ प्रकरणे पाठवा असा मुंबई खंडपीठाने १४ एप्रिल २००२ रोजी निर्णय देणे, असे असतांना गेल्या अनेक वर्षापासूनची हजारो प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे हकनाक पाठविण्याचा घडलेला अश्लाघ्य प्रकार, ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने ५ वर्षाची सेवा झालेली असेल तर त्या नेमणूका पूर्णपणे कायदेशिर आहेत, असा निर्णय कळविणे, मा. चॅन्सेलर महोदयांच्या मान्यतेनंतर करण्यात आलेल्या परिनियमातील तरतुदी प्रमाणे २ वर्षाच्या सेवेनंतर सेवेत कायम झालेल्या या अधिव्याख्यात्यांच्या सेवा १८ ऑक्टोबर २००१ च्या शासननिर्णयान्वये अखंडीत राहतील अशी तरतुद केलेली असतांना त्यांच्या नेमणूका तदर्थ आहेत असा भ्रम पसरविण्याचा नोकरशाहीकडून होत असलेला प्रयत्न, महाराष्ट्रामध्ये विधीवतरित्या नेटसेटची पात्रता परीक्षा सक्तीची करण्यात आल्यापूर्वीच्या कालखंडात व नंतरच्या कालखंडात भरती झालेल्या शिक्षकांना एकसारखी वागणूक देण्याचा होत असलेला दुराग्रह, या सर्व स्थितीची बारीक सारिक माहीती करुन घेतल्यानंतर मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी "२४ डिसेंबर २००८ च्या आत याबाबतचा शासननिर्णय काढण्यात येईल व पुढच्या तीन महिन्यात या सर्व प्रश्नांना पूर्णविराम देण्यात येईल." असे सांगून सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, **या सा-या प्रकरणामागे असलेल्या भ्रष्टाचारी वृत्तीने, उथळपणे व थिल्लरपणे काम करणा-या नोकरशाहीच्या काळ्याकुट्ट कारस्थानांचा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे हे कार्यकारी मंडळ तीव्र निषेध करीत आहे.**

६. "केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचा-यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारसी वरील केंद्र शासनाचे वेतन विषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतन निश्चितीचे सूत्र देखील केंद्र शासनाप्रमाणे असेल." असा धोरणात्मक निर्णय डिसेंबर १९७७ मध्ये राज्यशासनाने घेणे, आजपावेतो या धोरणात्मक निर्णयामध्ये राज्य शासनाच्या स्तरावर कोणताही बदल न होणे, दिनांक ६ ऑक्टोबर २००८ रोजी "सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापूर्व अग्रीम अदा करण्याबाबत" या विषयावरील शासननिर्णय निर्गमित होणे, त्याप्रमाणे सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन सुधारणापूर्व अग्रिम अदा होणे, ज्यांना वेतन सुधारणापूर्व अग्रिम मिळाला पण वेतनसुधारणा मात्र मिळालेली नाही असा हा एकमेव वर्ग आता महाराष्ट्रात अस्तित्वात असणे, "एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील." व "युजीसीकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल." अशी आश्वासने शासनातर्फे डिसेंबर २००८ मध्ये विधानपरिषदेत देण्यात आल्यावर त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे, दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी केंद्र शासनाचा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन सुधारणेचा शासन निर्णय निर्गमित होणे, त्याबरोबरच केंद्र शासनाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून "याबाबतची कार्यवाही ताबडतोब सुरु करा, आता तुम्ही कोणत्याही नवीन कागदपत्रांची वाट पाहू नका, ८० टक्के अर्थसहाय्य देण्यास आम्ही तयार आहोत, राज्य शासनाने ४० टक्के थकबाकी देण्यासाठी आमच्याकडून निधी न्यावा व ३१ मार्च, २००९ च्या आत याबाबतची कार्यवाही पार पाडावी." असे कळविणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने फेब्रुवारी, २००९ मध्ये सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना पत्र लिहून "दिनांक ३१ मार्च, २००९ च्या आत ४० टक्के थकबाकीची रक्कम घेवून जावी" असे कळविणे, "वित्तविभागाकडे प्रस्ताव ठेवला जाईल" असे डिसेंबर २००८ मध्ये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगून सुद्धा मार्च २००९ पर्यंत वित्तमंत्र्यांना याबाबत कोणतीही माहिती दिली न जाणे, हे खुद्द वित्तमंत्र्यांनीच सभागृहात मान्य करणे, शेवटी विद्यापीठ अनुदान आयोगाचे "ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे. मी जरुर याबाबतीत लक्ष घालतो." असे सांगण्याची मा. वित्तमंत्र्यावर वेळ येणे, हे सारे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांविषयी नोकरशाहीच्या मनामध्ये असलेली कमालीची आकसबुद्धी बटबटीतपणे समोर येते, **अशा या आकसबुद्धीच्या पोटी उच्च शिक्षण ही दुय्यम दर्जाची व्यवस्था समजून त्यात काम करणा-या शिक्षकांना कस्पटासमान लेखण्याच्या नोकरशाहीच्या वृत्तीची तीव्र निर्भत्सना करण्यात येत आहे.**

७. एक म्हणजे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून सेवेत भरती होतांना धारण करावयाच्या नेटसेटच्या पात्रता अटीविषयी, दुसरे म्हणजे सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करण्याविषयी, आणि तिसरे म्हणजे या स्तरावरील शिक्षकांच्या विविध समस्या व प्रश्नांविषयी नोकरशाहीच्या या धोरणाविरुद्ध तीव्र संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिक्षेप करण्याच्या व मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाविषयी व मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनासंबंधी तुच्छतेची भावना मनात बाळगण्याच्या नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा तीव्र धिक्कार** करण्यासाठी आज रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :-

(१) हा ठराव सम्मत झाल्याच्या दुस-याच दिवशी म्हणजे सोमवार,

दिनांक २० एप्रिल २००९ रोजी राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना महासंघाचे अध्यक्ष व सचिव पत्राद्वारे ठरावाची प्रत सादर करतील. दिनांक २० एप्रिल २००९ ते ५ मे २००९ या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेल्या सर्व विद्यापीठस्तरीय संघटना आपआपल्या मुखपत्राचा "आंदोलन विशेषांक" प्रकाशित करतील. या विशेषांकामध्ये रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेला आंदोलनाचा ठराव व तो ठराव राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना सादर करणारे पत्र, (१६ फेब्रुवारी २००९ च्या अध्यक्षांच्या पत्रासह) शब्दशः प्रकाशित करण्यात येईल. त्याच विशेषांकात जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय मेळाव्यांचा कार्यक्रम प्रकाशित करण्यात येईल. या अंकात प्रसिद्ध करावयाचा आंदोलन विषयक इतर मजकुर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या किंवा त्या त्या विद्यापीठस्तरीय संघटनेच्या पदाधिका-यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

(२) दिनांक २९ एप्रिल २००९ ते २६ मे २००९ या कालखंडात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या जिल्हा मेळाव्यांचे आयोजन केले जाईल. अ.न. जिल्ह्याचे नाव, मेळाव्याचे ठिकाण, मेळाव्याचा दिवस, दिनांक व वेळ यांचा समावेश असलेला महाराष्ट्रातील या सर्व जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम हा आंदोलन विशेषांकामध्ये प्रकाशित केल्याप्रमाणे असेल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील.

(३) जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम ज्या कालखंडात होत आहे त्याच कालखंडात विद्यापीठस्तरीय मेळाव्यांचे आयोजन विद्यापीठ स्तरीय संघटनेकडून केले जाईल. या मेळाव्याला राज्यस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. या मेळाव्याचा कार्यक्रम महासंघाचे अध्यक्ष व सचिव यांनी ठरविल्याप्रमाणे असेल. कोणत्याही परिस्थितीत हा कार्यक्रम ३० मे, २००९ या तारखेच्या पुढे जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

(४) दिनांक १ जून २००९ ते १२ जून २००९ या १०-१२ दिवसाच्या कालखंडामध्ये जिल्हास्तरीय नेते आपापल्या जिल्ह्यामध्ये आंदोलनाच्या प्रचारासाठी दौरे करतील.

(५) सोमवार, दिनांक १५ जून २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता त्या त्या विभागातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयासमोर निदर्शने करतील व त्यांच्यामार्फत मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना आंदोलनाची प्रथम सूचना देतील.

(६) सोमवार, दिनांक २२ जून २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता त्या त्या जिल्ह्यातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करतील व त्यांच्यामार्फत राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना आंदोलनाची दुस-यांदा सूचना देतील.

(७) सोमवार, दिनांक ६ जुलै २००९ रोजी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक एक दिवसाचे 'सामुहिक रजा आंदोलन' करतील.

(८) मंगळवार, दिनांक १४ जुलै २००९ रोजी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक बेमुदत काम बंद आंदोलनास सुरुवात करतील.

(९) सोमवार, दिनांक २० जुलै २००९ पासून महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक, राज्य मंत्रीमंडळातील कोणत्याही मा.मंत्रिमहोदयांनी जिल्ह्याच्या ठिकाणी सार्वजनिक समारंभात/कार्यक्रमात सहभाग घेतला असेल तर त्या समारंभ स्थळी/कार्यक्रम स्थळी नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा धिक्कार म्हणून व अशा मनोवृत्तीला आवर घालण्यास शासनाला आलेल्या अपयशाच्या विरोधात महासंघातर्फे तीव्र निदर्शने करतील.

**Prof. C.R.Sadasivan** — President
**Prof. E.H.Kathale** — General Secretary

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

*****

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव

# *जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन*

उपरोक्त ठरावातील परिच्छेद ७ (२) पुढील प्रमाणे आहे. :- "दिनांक २९ एप्रिल २००९ ते २६ मे २००९ या कालखंडात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या जिल्हा मेळाव्यांचे आयोजन केले जाईल. अ.न. जिल्ह्याचे नाव, मेळाव्याचे ठिकाण, मेळाव्याचा दिवस, दिनांक व वेळ यांचा समावेश असलेला महाराष्ट्रातील या सर्व जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम हा आंदोलन विशेषांकामध्ये प्रकाशित केल्याप्रमाणे असेल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील." सदरहू निर्णयाप्रमाणे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. एकनाथ कठाळे, सचिव, नुटा**

### तक्ता

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | मेळाव्याचा दिवस व दिनांक | मेळाव्याची वेळ | मेळाव्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ |
| १. अकोला | सोमवार, ०४.०५.२००९ | सकाळी १०.०० वा. | आर.एल.टी.सायन्स कॉलेज, अकोला. |
| २. बुलढाणा | सोमवार, ०४.०५.२००९ | दुपारी ५.०० वा. | जि.एस महाविद्यालय, खामगांव |
| ३. वाशिम | बुधवार, ०६.०५.२००९ | सकाळी १०.०० वा. | आर.ए.महाविद्यालय, वाशिम |
| ४. यवतमाळ | बुधवार, ०६.०५.२००९ | दुपारी ५.०० वा. | कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ. |
| ५. वर्धा | शनिवार, ०९.०५.२००९ | सकाळी ९.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| ६. चंद्रपूर व गडचिरोली | शनिवार, ०९.०५.२००९ | दुपारी ५.०० वा. | एस.पी. कॉलेज, चंद्रपूर. |
| ७. भंडारा व गोंदिया | बुधवार, १३.०५.२००९ | दुपारी १२.०० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा |

# MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**Affiliated to the AIFUCTO**

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020.*

**President**
Prof. C.R.Sadasivan
R.K.Gokuldham, A/205
S.V.Road, Borivli (West)
Mumbai-400 092

**General Secretary**
Prof. E.H.Kathale
N/162 Reshimbagh
Nagpur, 440 009

**Mumbai, 16th February 2009**

**To,**
**The Hon'ble Minister for Higher & Technical Education, Maharashtra State,**
**Mantralaya, Mumbai- 400 032**

**Subject :** MFUCTO Protest Demonstration at Azad Maidan on Monday 9th March 2009 of University and College Teachers

Sir,

MFUCTO at the meeting of its Executive Committee held on Sunday, 15th February 2009 while discussing the question of implementation of the UGC Sixth Pay Review Committee recommendations in Maharashtra as already notified by the HRD Ministry by letter dated 31st December 2008, expressed shock that the Government has not taken steps in that direction so far. In fact, the **MFUCTO had by the letters dated 12th January 2009 and 28th January 2009 called upon the Government to ensure that implementation of the new scales of pay for University and College Teachers takes place simultaneously with the implementation for State Government employees.** MFUCTO had also held a massive Dharna at Azad Maidan on 28th January 2009 and requested your goodself to grant an appointment to the MFUCTO Executive Committee for discussing various demands which have been pending for a long time.

Unfortunately, no meeting has been fixed by you so far nor has the revised pay scales for University and College Teachers been implemented though the Government has come out with Orders for the State Government employees. **As already pointed out the HRD Ministry by its letter dated 31st December 2008 has already notified the new revised scales for University and College Teachers.**

**MFUCTO also feels that the State Government has neglected the case of Non NET/SET Teachers appointed since 19th September 1991 who number about 10,000 by bringing them under the NET/SET qualification condition though the said qualification condition was never introduced in the State of Maharashtra as minimum mandatory entry point qualification till 11th December 1999. There are similarly other issues which also need to be resolved as contained in the Charter of Demands of the MFUCTO already submitted to you as Hon'ble Minister for Higher & Technical Education as also to your predecessor Earlier.**

In view of these facts, MFUCTO resolved to hold a Protest Demonstration at Azad Maidan in Mumbai on 9th February 2009, where teachers from different non agricultural universities in the State will be participating. Once again we are enclosing the Charter of Demands of the AIFUCTO and MFUCTO for ready reference.

It is once again requested that You may kindly give an appointment to the Executive Committee of the MFUCTO as the State level Organization to discuss the charter of demands to find just solutions to the long pending issues.

With warm regards,

Yours truly
**(C.R.Sadasivan)**
President

**Encl :** Documents as above
Copy forwarded with Compliments to
The Principal Secretary, Higher & Technical Education Maharashtra State, Mantralaya, Mumbai- 400 032

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020.*

(as adopted as part of the Final Report of the MFUCTO (as tasks ahead for the MFUCTO) for 2009 at the General Council Meeting held on Sunday, 21st December 2008 at Mumbai.)

# DEMANDS MEMORANDUM OF THE MFUCTO

1.Withdraw the move towards Privatization of Pension and Gratuity and extend old triple benefit scheme to those appointed after 1-1-2004 as recommended in the Chheda Committee report.

2. Grant Right to Strike; to all employees as part of their Trade Union rights.

3. Implement Chheda Pay Review Committee recommendations with modifications suggested by the AIFUCTO

3 (a) Resolve the problems of engineering college teachers including the withdrawal of their arrears for 55 months from 1-1-1996 to 31-7-2000 and simultaneous implementation with effect from 1-1-2006 of the Sixth Pay Commission recommended scales

3 (b) Resolve the problems of social work colleges in Maharashtra including granting of Pension to be brought into existence

4. Withdraw the anti-people and anti-education policies initiated by the State Government;

5. End Commercialization in the field of Education and reject recommendations of the National Knowledge Commission.

6.No dilution of the Constitutional provision on Right to Education through the New Bill on Education;

7.Immediately implement the UGC decision on enhancement of honorarium to Rs.1000/- per lecture for all guest lecturers.

8. Implement fully the UGC Leave Package;

9. Restore the Grants-in-aid system in all education institutions as before and ensure regular Payment of salaries in full and in time;

10. Ensure full Justice to NET/SET affected teachers;

11. Ensure proper Placements to teachers in the senior scale and selection grade taking into account total service rendered by the teacher;

12. Strengthen the public funded education system;

13. Ensure larger allocation of State funds for higher education and implement the Common Minimum Programme announced by the center;

14. Enact special provisions for women teachers;

15. Ensure that SET examination is made more transparent including fixing of unambiguous minimum percentage of mark;

16. Recognize the past service of Demonstrator, Tutors, Instructors towards counting of qualifying years of experience for CAS;

17. Ensure that service rendered by teachers outside the State of Maharashtra is counted for all benefits.

18.Grant the Benefit of Condonation of breaks in service of teacher by extending the benefit of the rules applicable to the school teachers for condonation of break up to 1/5th of qualifying service;

19. Grant Protection of salary of P/4 category teachers transferred to junior college and subsequently brought back to degree college;

20. Grant Remission of workload for college teachers undertaking PG work within and/or outside their universities;

21. Restore workload of university teachers;

22. Withdraw Government order for re-fixation and recovery of pay of Librarians/DPEs;

23.Implement Petitions committee recommendations in respect of Librarians/DPEs with retrospective effect;

24. Direct Appointment of DPEs in all colleges and Ensure filling of vacancies created either by retirement or for other reasons;

25. Enact suitable legislation for providing penalties for non-compliance of the Grievance committee recommendations;

26. Ensure that teachers who participate in seminars/conference/work- shops, examination duties, etc., in Universities and other academic bodies anywhere in India get their legitimate TA/DA and other benefits from the State through their respective institutions;

27. Extend the date of completion of Refresher/ Orientation Courses by teachers/Librarians/DPEs for CAS by 2 years including for engineering colleges

28. Ensure Release of pension to teachers on the date of their retirement;

29. Resolve the pending problems of Ayurved college teachers in Maharashtra.

30. Grant all the benefits which teachers are given under the central orders are extended to Librarians and Directors of Physical Education

31. Resolve the problem of workload consequent on changing over from 18 periods of 50 minutes to 20 lectures of 48 minutes and to ensure that teachers are not rendered surplus on that account;

32. Eliminate corrupt practices such as donations and unfair practices in admissions and appointments of staff.

**Sd/- E.H. Kathale**
General Secretary

**Sd/- C.R. Sadasivan**
President

**Mumbai, 14th January 2009**

## ‘आंदोलन विशेषांका’विषयी सूचना

(१) “दिनांक २० एप्रिल २००९ ते ५ मे २००९ या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेल्या सर्व विद्यापीठ स्तरीय संघटना आपआपल्या मुखपत्राचा “आंदोलन विशेषांक” प्रकाशित करतील.” असे रविवार, दिनांक १९ एप्रिल २००९ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार निश्चित करण्यात आले आहे.

(२) त्या त्या संघटनांनी आपल्या मुखपत्राचा आंदोलन विशेषांक प्रकाशित केल्यानंतर त्याच्या प्रती मा. मुख्यमंत्री, मा. उच्च शिक्षण मंत्री, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च शिक्षण सचिव, महाराष्ट्र राज्य व महासंघाच्या सर्व कार्यकारी मंडळ सदस्यांना पाठवाव्यात, असाही निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी ही विनंती.

**- डॉ. एकनाथ कठाळे, महासचिव, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ**

## जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणीच्या तातडीच्या सभा

संघटनेच्या जिल्हा कार्यकारी मंडळांच्या व तालुका कार्यकारी मंडळांच्या तातडीच्या बैठकी आयोजित करण्यात याव्यात. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व तालुका पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यामध्ये व तालुक्यामध्ये दौरे आयोजित करुन उपरोक्त मेळावे/आंदोलन यशस्वी करण्यासाठी कार्यरत व्हावे **अशी विनंती करण्यात येत आहे. - सचिव “नुटा”**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **25.04.2009**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,.....................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................